


मा.श्री प्रियांस जानी, मा.श्री सतिश सहानी, श्रीम.सहानी,डॉ.मंगला सरदेशपांडे,डॉ.उषा ठक्कर,मा.रक्षा मेहता,मा.सुरेखा दळवी

# टावरवाडी गाव झाले हंगणदारी मुक्त

गांधी स्मारक निधी, मुंबई या संस्थेने पनवेल तालुक्यातील ग्रप ग्रामपंचायत मालडुंगे मधील टावरवाडी हे आदिवासी गाव समग्र विकासासाठी घेतले आहे. आजपर्यत या गावात पाणी पुरवठा योजना दिली होती. शाळेतील मुलांना गणवेष देण्यात आले होते. गावाच्या मध्यभागी भले मोठे समाजमंदीर बांधून देण्यात आलेले आहे.  यामध्ये बालवाडी चालविण्यात येत होती.  वारंवार या गावात जाऊन जाणीव-जागृतीची शिबिरे घेतली जातात तसेच ७ दिवसीय निवासी एन.एस.एस.ची शिबिरे घेतली जातात अशा प्रकारे गावात विकासाच्या दृष्टीने कामे केली जातात

१५० वी गांधी जयंती निमित्ताने १७ शौचालय बांधून त्याचे उद्घाटन - प्रमुख पाहुणे     मा.श्रीम.डॉ.उषा ठक्कर, अध्यक्षा,मणीभवन गांधी संग्रहालय,मुंबई-विश्वस्त, गांधी स्मारक निधी मुंबई.  यांच्या हस्ते तर मा.श्रीम.रक्षा मेहता,उपाध्यक्षा, गांधी स्मारक निधी विश्वस्त मणीभवन गांधी संग्रहालय,मा. सतिश सहानी, विश्वस्त गांधी स्मारक निधी व मणीभवन गांधी संग्रहलाय,मा.प्रा.डॉ.मंगला सरदेशपांडे, विश्वस्त गांधी स्मारक निधी, मुंबई,श्री प्रियांस जानी विश्वस्त गांधी स्मारक निधी व मणीभवन गांधी संग्रहलाय, मा. सुरेखा दळवी, विश्वस्त, गांधी स्मारक निधी, मुंबई,मा.श्री.विष्णू प्रभुदेसाई, कार्यवाह, कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन,मा.श्री.प्रमोद ठाकूर, सहकार्यवाह,कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन, मा.फाल्गुनी मेहता कार्यकारी सदस्या,कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन,मा.पद्माताई गुप्ते,संपादक पंचायत भारती आणि साधना वैराळे मंडलिक ट्रस्ट तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडले

सुरुवातीला आश्रमशाळेतील मुलांनी पाहुण्यांचे लेझिमव्दारे स्वागत केले. नंतर स्वागत गीत म्हटले त्यानंतर आश्रमशाळेतील मुलांनी गांधीजीच्या जीवनावरील नृत्यगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. यानंतर आर.के.बीएड.कॉलेज भांडुप यांनी स्वच्छता अभियान यावर सुंदर असे पथनाट्य सादर केले या दोन्ही कार्यक्रमाने पाहुण्यांची मने जिंकली

मा.रक्षा मेहता यांनी कार्यक्रमप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना म्हणाल्या
आज पर्यत विविध संस्थांनी मिळून टावरवाडी गावात १५१ शौचालय बांधून पुर्ण करण्यात आली आहेत. म्हणजे आता गाव हंगणदारी मुक्त झाले आहे. आता ही शौचालय नीट वापरा चांगली स्वच्छ ठेवा.

मा.सतिश सहानी (माजी मुंबई कमिशनरसाहेब) यांनी सांगितले भारत हा खेड्याचा देश आहे. इकडे आल्यानंतर आम्हा सर्व मंडळीना फार बरे वाटते. आता रोजगारासाठी शहर येण्याची धडपड करु नका विविध संस्था तुम्हा गावासाठी विविध योजना राबवित आहेत. त्याचा तुम्ही परीपुर्ण उपभोग घ्यावा.

मा.डॉ.मंगला देशपांडे यांनी म्हटले आम्हा कॉलेजच्या मुलांनी आणि आश्रमशाळेतील मुलांनी केलेले नृत्य आणि पथनाट्य खुपच आवडले. तुमचे कौतुक करावे तेवढे थोडचं आहे. गाव फार सुंदर आहे.

मा.प्रियांस जानी म्हणाले या गावात येऊन मला फार आनंद झाला आहे. आम्ही मंडळी शहरात राहतो पण असे वातावरण शहरात नाही. त्यामुळे तुम्ही फार सुखी आहात. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मा.उषा ठक्कर आणि मा.रक्षा मेहता यांच्या गावात येण्याचे भाग्य लाभले.

मा.सुरेखा दळवी यांनी गांधीजीच्या जीवनातील अनेक महत्वपूर्ण गोष्टी सांगत भूतकाळाला उजाला दिला.

मा.पद्मावती गुप्ते यांनी जास्त न बोलता सर्वाचे कौतुक केले. पुन्हा मी गावात येईन असे सांगितले

प्रमुख पाहुणे डॉ.उषा ठक्कर म्हणाल्या सर्व कार्यक्रम चांगला झाला याचे श्रेय मी रक्षा मेहता यांना देते त्यांच्या मार्गदर्शनानुसार सर्वांनी आपआपल्या परीने छान कामे केली. त्यामुळे या कार्यक्रमाला शोभा आली.
या गावात आता सर्व शौचालय बांधून झाली आहेत. आता कोणीही उघडावर शौचालयला जाऊ नये, गावात स्वच्छता राखा, व्यसने असतील तर बंद कारा असे सुचक मौल्यवान विचार मांडले.

कार्यक्रम प्रसंगी १७ शौचालय लांभार्थीना माहितपत्रक व बादली आणि मग देण्यात आले. त्याचप्रमाणे टावरवाडी गावातील ग्रामस्थांनी सुध्दा त्यांच्या शेतात पिकवलेली भाजी सर्व पाहुण्यांना भेट दिली. सर्वांना कार्यक्रम प्रसंगी गांधी स्मारक निधी कडून अल्पोहार देण्यात आला होता.

या सर्व कार्यक्रमासाठी आश्रमशाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय गुळुंबकर व विजयश्री पाटील यांनी केले तर आभार संस्थेचे सहकार्यवाह मा.ॲड.प्रमोद ठाकूर यांनी आभार मानले